MHKO100002222018

**नियमीत दिवाणी दावा क्र. ३९/२०१८**

इंदिरा पुजारी वगैरे.
//वि//
जयवंत कांबळे वगैरे.

**निशाणी क्र.६० वर आदेश**

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका ६, नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीसाठी व आदेशिका १, नियम १० अन्वये पक्षकारांना समील करुन घेणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादींतर्फे सदर अर्जाचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. वादी यांनी अर्जात असे कथन केले आहे की, त्यांनी प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी व कायम मनाईसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत कामातील प्रतिवादी क्र.१० सोनाबाई शंकर करनिंग ही मयत झालेचे समजलेनंतर तिचे वारस अभिलेखावर घेणेसाठी अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१० चे वारसांना नोटीसा पाठविलेनंतर, प्रतिवादी क्र.१० चे वारसांपैकी क्र.१०इ) दिलीप शंकर करनिंग हे दिनांक १३/०१/२००९ व १०ई) राजू शंकर करनिंग हे दिनांक १२/०९/२००६ रोजी मयत झाले असलेचे बेलिफ अहवालावरुन समजून आलेनंतर तिचे वारस अभिलेखावर आणसोसाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत प्रतिवादी क्र.१० चे वारस हे दावेपूर्वी मयत आहेत हे प्रतिवादी क्र.१० च्या वारसांना नोटीस पाठविलेनंतर समजलेमुळे त्यांना प्रस्तुत कामी पक्षकार म्हणून सामील करणे गरजेचे आहे. त्यामुळे, प्रस्तुत दावेचे कामी प्रतिवादी क्र.११ नंतर प्रतिवादी क्र.१०इ व १०ई यांच्या वारसांना प्रतिवादी क्र.१२ ते १५ म्हणून सामील करणे भाग पडले आहे. सबब, दावा मनाई अर्जाचे मथळयामध्ये प्रतिवादी क्र.११ नंतर प्रतिवादी क्र.१२ ते १५ म्हणून सामील करणे गरजेचे आहे. तरी वादी यांनी अर्जात दिलेप्रमाणे पक्षकार सामील करुन घेणेस व अर्जात नमुद दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेबाबत विनंती केली. प्रस्तुत सुचविलेली दुरुस्तीमुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, वादी यांनी अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जाचे मागील पानावर हरकत नोंदविली व असे कथन केले की, सदरचा अर्ज चुकीचा व बेकायदेशिर आहे. सदर अर्जात नमुद केलेल्या व्यक्ती हया अनुक्रमे २००६ व २००९ साली मयत झालेल्या असून त्याबाबत वादींनी अर्जात स्पष्टपणे तारखाही नमुद केलेल्या आहेत. सदरचा दावा हा सन २०१८ सालचा आहे, त्यामुळे दावा दाखल करणेपूर्वी सदर व्यक्ती हया १२ व ९ वर्षांपूर्वी मयत झालेचे दिसून येते. त्यामुळे, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०४. प्रकरणाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादी यांनी वाटपासाठी व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादींचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१० सोनाबाई शंकर करनिंग ही मयत झालेचे समजलेनंतर तिचे वारसांना नोटीसा पाठविलेनंतर, प्रतिवादी क्र.१० चे वारसांपैकी क्र.१०इ) दिलीप शंकर करनिंग हे दिनांक १३/०१/२००९ व १०ई) राजू शंकर करनिंग हे दिनांक १२/०९/२००६ रोजी मयत झालेचे बेलिफ अहवालावरुन समजून आले आहे. त्यामुळे, त्यांना प्रस्तुत दावेचे कामी पक्षकार म्हणून सामील करणे गरजेचे आहे. प्रतिवादी यांनी त्याबाबत हरकत घेतली आहे. प्रस्तुत दावा हा वाटपासाठी दाखल केलेला असल्याने दाव्याचे स्वरुप व मागणी पाहता वादीने मागणी केलेप्रमाणे प्रस्तुत दावेचे कामी प्रतिवादी क्र.१० यांचे वारस प्रतिवादी क्र.१०इ व १०ई हे दाव्याचे निकालाचे कामी आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे, सदर पक्षकारांना दाव्यात सामील केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याऊलट, दावा हा गुणदोषावर आणि सर्व पक्षकारांच्या उपस्थितीमध्ये निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे, मुळ दाव्यात कोणतीही दुरुस्ती नसल्याने व केवळ दाव्यात पक्षकार सामील झाल्याने मुळ दाव्यात कोणतेही बदल होत नसल्याने दाव्याचे स्वरुप बदलणारे नाही. तसेच, प्रस्तुतचा दावा हा प्राथमीक स्थितीत आहे. दाव्याची चौकशी अद्याप सुरु झालेली नाही, त्यामुळे आदेश ६, नियम १७ च्या निर्बंधाची बाधा प्रस्तावित दुरुस्तीस येत नाही. सदरची दुरुस्ती दाव्याच्या प्राथमीक स्थितीमध्ये मागितलेली असल्यामुळे ती मंजुर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्याऊलट, दाव्याचा गुण-दोषावर न्यायनिर्णय करण्यासाठी मदतच होणार आहे. सबब अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. त्यामुळे, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**-: आदेश :-**

०१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. वादी यांनी अर्जात सुचविलेली दुरुस्ती १४ दिवसांच्या आत दाव्यामध्ये करुन त्याअनुषंगाने दुरुस्त दाव्याच्या प्रती न्यायालयात सादर कराव्यात.

०३. वादी यांनी दाव्याची दुरुस्त प्रत हजर केलेनंतर प्रतिवादी क्र.१२ ते १५ यांना समन्स काढण्यात यावेत.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SUJIT AMBADAS RATHOD
Date: 2023.06.15 17:26:59 +0530

**( एस. ए. राठोड )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः १५/०६/२०२३.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. A. Rathod,<br>Jt. Civil Judge Jr. Dvn. and Judicial Magistrate First Class, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 15/06/2023 |
| Order signed by P.O. on | 15/06/2023 |
| Order uploaded on | 16/06/2023 |